# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
## (अधिष्ठाता यांचे कार्यालय)

SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED
PH NO (02446)245792/248963/249302/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com

जा.क्र. वैमअं/किमांवि/दरपत्रके मागणी/ 6803 /२०२२ दिनांक:- १० /०६ /२०२२

**कार्यालयीन आदेश**

विषय :- लेखन सामुग्री,साफसफाई व इ. किरकोळ साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत...
संदर्भ :-१.दि.२८.०४.२०२२ रोजीची खरेदी समितीची बैठक.
२.दि.०२.०६.२०२२ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग, प्रशासकीय कार्यालय व वैद्यकीय विद्यार्थी वसतीगृहांकरीता लेखन सामुग्री, साफसफाई व इ. किरकोळ साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे सोबत जोडलेल्या यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक १६/०६/ २०२२ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १७/०६/२०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील. तसेच दरपत्रकधारकास दरपत्रके उघडण्याकरीता उपस्थित राहवयाचे असल्यास या कार्यालयाची काही हरकत नाही.

| अ.क्र. | साहित्यांचे नाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.३४ पर्यंतची यादी पान क्र.०२ वर देण्यात आलेली आहे. | एकुण ३४ नग | ... |

अटी व शर्ती :-

०१.दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासनमान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा दरपत्रक धारकाकडे सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

०२.दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

०३.दरपत्रका सोबत शासनमान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत,सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षाचे आयटीआर प्रमाणपत्र जोडण्यात यावे तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना पान क्र. ०३ वर देण्यात आलेला आहे.)

०४.दरपत्रकातील साहित्यांच्या दरात जीएसटी कर समाविष्ठ करण्यात आला आहे किंवा अतिरिक्त आकारला जाणार आहे याबाबत नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकातील दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

०५.मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.

०६.प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

०७.पुरवठा करण्यात येणारे साहित्य नामांकीत कंपनीचे गॅरंटी व वारंटीसह चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्य करण्यात येतील तसेच रद्य करण्यात आलेल्या आदेशाचे कोणतेही देयक अदा केले जाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

०८.तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील व याबाबत कसल्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

०९.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रत:- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता लागणाऱ्या खालील प्रमाणे लेखन सामुग्री व इ.किरकोळ साहित्यांचे दरपत्रक देण्यात यावे.

| Sr.no. | Name of the Item | Qunt. | GST % | Rate |
|---|---|---|---|---|
| ०१ | रजिस्टर बुक २ क्वॉयर बायंडींगसह | ०१ नग | | |
| ०२ | रजिस्टर बुक ३ क्वॉयर बायंडींगसह | ०१ नग | | |
| ०३ | रजिस्टर बुक ५ क्वॉयर बायंडींगसह | ०१ नग | | |
| ०४ | रजिस्टर बुक ६ क्वॉयर बायंडींगसह | ०१ नग | | |
| ०५ | रजिस्टर बुक ८ क्वॉयर बायंडींगसह | ०१ नग | | |
| ०६ | रजिस्टर बुक १० क्वॉयर लेदर बायंडींगसह | ०१ नग | | |
| ०७ | बॉक्स फाईल मोठी | ०१ नग | | |
| ०८ | बॉक्स फाईल लहान | ०१ नग | | |
| ०९ | डिंक बॉटल १५० एम.एल. | ०१ नग बॉटल | | |
| १० | लाल टॅग बंडल लहान | (५० नग) ०१ बंडल | | |
| ११ | पांढरे टॅग बंडल मोठे | (५० नग) ०१ बंडल | | |
| १२ | टेबल ग्लास (२.५ बाय ३.० फुट) | ०१ नग | | |
| १३ | ऑफिस फाईल दोन बंदी फोलिओ | ०१ नग | | |
| १४ | ऑफिस फाईल चार बंदी फोलिओ | ०१ नग | | |
| १५ | पोछा (ताट) (गाला कंपनी) | ०१ नग | | |
| १६ | मऊ झाडु (टॉप क्वॉलिटी) | ०१ नग | | |
| १७ | खराटा (टॉप क्वॉलिटी) | ०१ नग | | |
| १८ | टिशु पेपर रोल (१० सें.मी.X ४४ मी.) | ०१ रोल | | |
| १९ | ट्युब स्टीकर | (१००० नग)०१ पॉकिट | | |
| २० | कॅल्क्युॅलेटर १२ डिजिट (कॅसिओ) | ०१ नग | | |
| २१ | बॉलपेन (निळा/ लाल/ काळा) पॉकीट | (१० नग) ०१ पॉकीट | | |
| २२ | पॉकीट (६ इंच X १२ इंच) | (१०० नग) ०१ पॉकीट | | |
| २३ | पायपुसणी कापडी डोअर मॅट (२ बाय ३ फुट) | ०१ नग | | |
| २४ | चेअर कुशन (स्पंज) | ०१ नग | | |
| २५ | प्लास्टीक बकेट ०५ लिटर (किंग/प्लास्टो/पारस) | ०१ नग | | |
| २६ | लाख कांडी (४०० ग्रॅम) | (२० नग) ०१ बॉक्स | | |
| २७ | टेबल रेक्झीन | ०१ मीटर | | |
| २८ | स्टीकींग ब्राऊन कलर | ०१ रोल | | |
| २९ | स्टीकींग सिलव्हर कलर | ०१ रोल | | |
| ३० | प्लास्टीक डस्टबीन ८० लिटर (चाकासह) (प्लास्टो/पारस) | ०१ नग | | |
| ३१ | कार्बन पेपर निळा/काळा | (१०० नग) ०१ पॉकिट | | |
| ३२ | प्लास्टीक ट्रे | ०१ नग | | |
| ३३ | जाळया काढण्याचा झाडु मोठा | ०१ नग | | |
| ३४ | वायफर (घाणपाणी काढण्यासाठी) (गाला कंपनी) | ०१ नग | | |

नोट :- उपरोक्त प्रमाणे सर्व साहित्य चांगल्या प्रतीचे टिकाऊ तसेच बाजारभावा प्रमाणे रास्त असणे आवश्यक आहे.तसेच सदर दरपत्रकातील प्रत्येक साहित्यांच्या समोर जीएसटी कर किती टक्के आहे व सादर केलेले दर जिएसटीसह आहे किंवा अतिरिक्त आहे.याबाबत नमुद करावे. तसेच मागणी करण्यात आलेले आपल्या फर्मचे सर्व प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा दरपत्रके रद्द करण्यात येतील.तसेच रद्द केलेल्या संबंधीत दरपत्रकाबाबत लेखी कळविण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या साहित्यांच्या दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असुन आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही. तसेच याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाचीस्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

नाव :-

ठिकाण :-

पत्ता :-

मो.नं. :-